**दिनांक २१ नोव्हेंबर, २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे सभागृहात संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.**

---

सभेस उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांची नोंद नोंदवहीत घेण्यांत आली आहे.

सर्वप्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करून प्र.महाव्यवस्थापक, जिउकें, जळगांव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली. खालील विषयांवर/ मुद्यांवर सभेत सविस्तर चर्चा होवून आवश्यक निर्णय घेण्यांत आले. सभेत चर्चा झाल्यानंतर त्यावर संबंधीत यंत्रणेने /विभागाने /संस्थेने इतिवृत्ताची वाट न बघता त्वरीत कार्यवाही करावयाची आहे असे मा.अध्यक्षांनी सभेत सांगितले. तसेच यापुढे या सभेचे इतिवृत्त सर्वसंबंधीत सभासदांना इ-मेद्वारे पाठविण्यांत येतील याची नोंद घ्यावी असेही मा.अध्यक्षांनी सभेत सांगितले.

**विषय क्र.१:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे:-**

मागील दिनांक १८ सप्टेंबर, २००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्तावर कोणाही सभासदाकडून काहीही हरकत नसल्याने इतिवृत्त वाचून कायम करण्यांत आले.

**विषय क्र.२:- इतिवृत्तावरील केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे :-**

**१) जळगांव शहर महानगरपालिका संबंधीत औद्योगिक संघटनांचे विविध प्रश्नः-**

मागील सभेत ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या पुढील बैठकित दिनांक २८-७-२००९ च्या बैठकीतील मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपायुक्त (विविध कर), जळगांव शहर महानगरपालिका यांनी सभेत सांगितले.

**कार्यवाही - मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका**

**२) जळगांव औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम २००९ अन्वये क्षेत्रसभा स्थापन करणे बाबत:-**

याविषयी प्रस्ताव तयार करून तो महासभेत मंजूरीसाठी पाठविला असल्याचे उपायुक्त, जळगांव शहर महानगरपालिका यांनी सभेत सांगितले.

**कार्यवाही - मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका**

**३) धुळे येथील एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता कार्यालय जळगांव येथे हलविणे बाबत:-**

दिनांक १८ जुलै,२००९ रोजी झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे जळगांव औद्योगिक क्षेत्राचा विचार करता तसेच औद्योगिक संघटनांची मागणी विचारात घेता एमआयडीसीचे धुळे येथील विभागीय कार्यालय जळगांव येथे हलविणे बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना मा.जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीचे अर्ध शासकीय पत्र देणेत आले आहे. त्यानंतर मागील सभेत ठरल्याप्रमाणे जिल्हा उद्योग केंद्राने त्यावर त्यांना स्मरणपत्र पाठविले आहे. याविषयी कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे यांनी सांगितले की, सदरचा विषय संचालक मंडळाचे बैठकीपुढे घेण्यास विनंती केली आहे असे सांगितले. याविषयी पुढे झालेल्या प्रगतीची माहिती पुढील सभेत द्यावी असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे**

**४) जळगांव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.जे-७६ यांना प्लॉट समोर रस्ता बनवून मिळणे:-**

यािवषयी कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे यांनी सांगितले की, सदरचा रस्ता बनविणेबाबतचा प्रस्ताव तयार करून तो प्रशासकीय मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविणेत आलेला आहे. अद्याप मंजूरी मिळालेली नाही. मंजूरीबाबत पाठपुरावा सुरू आहे असे सांगितले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, धुळे.**

**५) उद्योगाच्या विस्तारीकरणासाठी खुले भूखंड व आरक्षित भूखंड लवकरात लवकर वाटप होणे बाबत:-**

जळगांव औद्योगिक क्षेत्रात दाल मिल, ऑईल मिल, प्लॅस्टीक्स यासारखे उद्योग घटक असल्यामुळे एफएसआय पुर्ण होवू शकत नाही, परंतू जागेची आवश्यकता इतर कामांसाठी drying platform, storage यासाठी लागते. त्यासाठी FSI Reduce करणेसाठी कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे यांनी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांना कळविले आहे. उपस्थित क्षेत्र व्यवस्थापक यांनी सांगितले की, याविषयी मुख्यालयाकडे पाठपुरावा करणेत येईल.

**कार्यवाही:- प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक.**

**६) जळगाव औद्येगिक क्षेत्रातील भूखंडांची निविदा पद्धतीने विक्री बंद करणे:-**

याविषयी मागील सभेत ठरल्याप्रमाणे समितीचा ठराव प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी त्यांचे मुख्यालयाकडे पाठविला असून संचालक मंडळाचे सभेपुढे प्रस्ताव चर्चा करून निर्णय घेण्यासाठी सादर केलेला आहे असे उपस्थित क्षेत्र अधिकारी यांनी सभेत सांगितले.

**कार्यवाही:- प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, नाशिक**

**७) एमआयडीसीने औद्योगिक क्षेत्रासाठी नवीन अग्निशमन केंद्राची तरतूद करणे:-**

याविषयी मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे महानगरपालिकेमार्फत याठिकाणी अत्याधुनिक फायर फायटींग इक्विपमेन्ट ठेवण्यांत आले असून त्या ठिकाणी कोणतेही अतिक्रमन राहिलेले नाही असे उपायुक्त, जळगांव शहर महानगरपालिका यांनी सभेत सांगितले. तसेच सध्या महानगरपालिका, जळगांव यांचेकडे असलेले अग्निशमन केंद्र परत घेणेबाबत मुख्यालय स्तरावर विचार सुरू असल्याचे कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे यांनी सभेत सांगितले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे.**
**आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका.**

**८) औद्योगिक क्षेत्रामध्ये प्लॉटेबल लॅन्डचे प्लॉट पाडून सरळ पद्धतीने गरजू उद्योजकांना त्यांचे वाटप करणे:-**

याविषयी मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे प्रस्ताव तयार करून तो मुख्यालयास मंजूरीसाठी पाठविणेत आला आहे असे क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. यावर प्रस्ताव मंजूरीसाठी पाठपुरावा करणेत यावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**कार्यवाही - प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक.**

**९) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव येथे उद्योग सेतू सुरू होणे बाबत:-**

जिल्हा उद्योग केंद्र,जळगांव येथे उद्योग सेतूचे कामकाज सुरू करण्यांत आले असून प्रथम जिल्हा उद्योग केंद्राकडील ईएम पार्ट-१ व पार्ट-२ देणेची कार्यवाही दिनांक २२/१०/२००९ पासून सुरू केली असल्याचे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. इतर खात्यांकडील कामे सुरू करणेबाबत संबंधीत खात्यांशी समन्वय साधून आवश्यक ते फॉर्म्स मागविले आहेत. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि., सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडून नमुना फॉर्म्स उपलब्ध झालेले आहेत. सेतू कक्ष उभारणीचे काम प्रगतीपथावर असून साधारणत: १५ दिवसांत इतर विभागांचे कामकाज सुरू होईल असेही सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. तसेच उद्योग सेतूची वेबसाईट तयार करावी व त्यावर उद्योगासाठी लागणारे विविध माहिती नमूद करावी असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**१०) <u>विद्यूत वितरण कंपनी संबंधातील विविध प्रश्न</u>**

याविषयी सभेत चर्चा झाली असता, मुख्य अभियंता, जळगांव परिमंडळ यांचेकडे औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधींसोबत एक बैठक झाली असून त्यात उद्योजकांचे खालील प्रलंबित कामांविषयी चर्चा झाली. (१) ऊर्जा मित्र समितीची सभा नियमित घेणे (२) Consumer Grievances Redressal Cell (३) Consumer Service Centre (४) औद्योगिक ग्राहकांना मिटर रिप्लेसमेन्ट रिपोर्ट मिळणे (५) जळगांव विभागीय कार्यालयासाठी कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल (महसुल) यांची नेमणूक करणे (६) जळगांव एमआयडीसी एरियासाठी म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि. यांचा स्वतंत्र विभाग निर्माण करणे. सदर विषयांवर बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे पुढील कार्यवाही मुख्य अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी यांचेमार्फत सुरू आहे असे अधिक्षक अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि. यांनी सभेत सांगितले.

**कार्यवाही - अधिक्षक अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि., जळगांव.**

**११) एमआयडीसी व्हि सेक्टरमध्ये अनेक अवैध धंदे सुरू असून त्यांचा उपद्रव थांबविणे:-**

याविषयी सभेत चर्चा झाली असता व्हि सेक्टरमधील अवैध धंदे बंद करण्यासाठी सदर धंदे हे अतिक्रमीत जागेवर असून कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे यांनी अतिक्रमण मोहिम राबवावी व त्यांना आवश्यक असलेले पोलीस बल जिल्हा पोलीस अधिक्षक, जळगांव यांचेकडून मिळणेसाठी तसा त्यांचेकडे प्रस्ताव पाठवावा असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले. सदर अतिक्रमण हे येत्या १५ दिवसांत काढावे असेही सूचीत केले.

**कार्यवाही - कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे / जिल्हा पोलिस अधिक्षक, जळगांव.**

**१२) मे.स्पार्क इरिगेशन प्रा. लि.,तरसोद, ता.जि.जळगांव यांना अखंडित विद्यूत पुरवठा मिळणे बाबत:-**

या उद्योग घटकास विद्यूत पुरवठ्याचे बाबतीत फिडर बदलून देता येईल किंवा कसे याविषयी शक्यता पाडताळून बघितली असून तो फिजीबल होणार नाही असे कार्यकारी अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि. यांनी मागील सभेत सांगितले होते. तसेच एमआयडीसीचे एक्सप्रेस फिडरवरून पुरवठा द्यावयाचा झाल्यास बराच आर्थक ताण कंपनीवर पडणार आहे, तसेच अधिकार मुख्य कार्यालयास असल्याचे अधिक्षक अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि. यांनी सभेत सांगितले. **कार्यवाही - अधिक्षक अभियंता, म.रा.विद्यूत वितरण कंपनी लि.,जळगाव.**

**(१३) वीज कायदा २००३ अन्वये जिल्हास्तरीय समन्वय समितीवर औद्योगिक ग्राहक प्रतिनिधीची नेमणूक करणे बाबत :-**

विद्यूत निरिक्षक, जळगांव यांनी वीज कायदा २००३ अन्वये जिल्हास्तरीय समितीवर औद्योगिक प्रतिनिधींची नेमणूक करणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे आदेश मा.अध्यक्षांनी दिले.

**कार्यवाही - विद्यूत निरिक्षक, जळगांव.**

**(१४) सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत विद्यूत शुल्क माफीची प्रकरणे विद्यूत निरिक्षक यांनी निकाली काढणे बाबत:-**

खान्देश जिन प्रेस कारखानदार आणि ट्रेडर्स डेव्हलपमेन्ट असोसिएशन यांनी विद्यूत शुल्क माफीची प्रकरणे यापुर्वी विद्यूत निरिक्षक नाशिक हे मंजूर करीत असत. परंतू आता विद्यूत निरिक्षक यांचे जळगांव येथे कार्यालय सुरू झालेले असल्याने सदरहु प्रकरणे जळगांव येथे मंजूर व्हावीत, नाशिक/मुंबई येथे पाठवून उद्योजकांची अडवणूक होते असे या समितीस कळविले आहे. त्यानुसार विद्यूत निरिक्षक, जळगांव यांनी सांगितले की, सदरची बाब मुख्य कार्यालयाच्या अखत्यारीत आहे. याविषयी या समितीमार्फत मुख्य अभियंता (विद्यूत), सार्वजनिक बांधकाम विभाग), मुंबई यांना पत्र देवून सदरचे अधिकार जिल्हास्तरावर देण्यांत आल्यास कामाचा जलद निपटारा होईल असे शिफारस करावे असे ठरले.

**कार्यवाही - विद्यूत निरिक्षक, जळगांव.**

**<u>विषय क्र.३:- सभेपुढे आलेले नवीन विषय:-</u>**

**जळगांव इंडस्ट्रीज असोसिएशन (जिन्दा) यांनी कळविलेले विविध प्रश्न:-**

**१) एमआयडीसी एरियातील भूखंड हस्तांतर करतांना आवश्यक असणा-या कामगार आयुक्तांच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या बाबतीत माहिती मिळणे:-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे परिपत्रक क्र.मऔविम/मुदतवाझ/विधी व कामकाज/८९, दिनांक २८/१०/२००९ च्या वरील विषयाबाबतचे परिपत्रकाचे सभेत वाचन करण्यांत आले. त्यातील कामगारांची देणी दिल्याबाबत कामगार आयुक्तांकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय कंपनीचे / भूखंडाचे हस्तार करून नये, अशी अट ही उद्योग विस्तारास जाचक असून त्यामुळे महामंडळाकडे भूखंड हस्तारणाची बरीच प्रकरणे पडून आहेत. उद्योजकांनी नमूद केले की, बंद कारखान्यांसाठी अशी अट ठिक आहे, परंतू जे कारखाने सध्या सुरू आहेत व अशा कारखान्यातील घटना बदलासाठी/ भागिदारीतील बदल करारनामा करून घ्यावा वरील अट लावू नये अशी विनंती केली. सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने याविषयी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आजच्या सभेचा संदर्भ देवून प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी पत्र लिहावे असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

**२) महवितरण कंपनीने औद्योगिक ग्राहकासाठी वेगळा निधी ठेवून मटेरियलची उपलब्धता ठेवणे:-**

याविषयी सभेत चर्चा झाली असता जर औद्योगिक परिसरातील एखादा ट्रान्सफॉर्मर अचानक बंद पडला तर कंपनीकडे स्टॅन्डबाय ट्रान्सफॉर्मर उपलब्ध नसतो. तसेच विद्यूत पुरवठ्यासाठी लागणारी इतर यंत्रसामुग्री देखील उपलब्ध नसते असे उद्योजकांनी सभेत सांगितले. यावर सदरची बाब मुख्य अभियंता, महावितरण यांचेशी निगडीत असून त्यांना तसे कळविणेत येईल असे उपस्थित अधिक्षक अभियंता, महावितरण यांनी सभेत सांगितले.

**३) एमआयडीसीने Commodity wise FSI Relaxation बाबत सविस्तर प्रस्ताव मुख्यालयास पाठविणे:-**

याविषयी औद्योगिक संघटनांनी इंडस्ट्रीवाईज जसे दाल मिल, ऑईल मिल, पीव्हीसी, मॅट याप्रकारे सविस्तर प्रस्ताव द्यावा, तो मुख्यालयाकडे शिफारस करण्यांत येईल असे कार्यकारी अभियंता, मऔविम, धुळे यांनी सभेत सांगितले.

**विषय क्र.४ :- मा.अध्यक्षांचे परवानगीने आलेले आयत्या वेळचे विषय:-**

१) केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाची माहिती मा.अध्यक्षांनी सभेत दिली व उद्योजकांनी या संधीचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन केले. त्याचप्रमाणे केंद्र शासनाची एमएसईसीडीपी कार्यक्रमांतर्गत समुह विकास योजनेची सविस्तर माहिती सभासदांना दिली तसेच जिल्ह्यात मोठे उद्योग आणण्याबाबत औद्योगिक संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी देखील प्रयत्न करावेत असेही आवाहन केले.

२) केंद्र शासनामार्फत सुरू असलेल्या समुह विकास (Cluster Development) योजनेची माहिती सदस्य-सचिव यांनी सभेत दिली तसेच जळगांव साठी पी.पी.मॅट क्लस्टर बाबत प्रस्ताव तयार करण्यांचे काम सुरू असल्याचे सांगितले.

३) सुक्ष्म व लघु उद्योग घटकांचे पेमेन्ट मोठ्या उद्योजकांकडून लवकर मिळत नाही असा मुद्दा उद्योजकांनी सभेत उपस्थित केला. Delayed Payment बाबत शासनस्तरावर विचार विनिमय सुरू असून लवकरच ॲक्टनुसार राज्य व जिल्हास्तरावर Facilitation समिती स्थापन झाल्यावर त्यावर कार्यवाही करण्यांत येईल असे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सदस्य-सचिव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
प्र.महाव्यवस्थापक,जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.

सही/-
जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, जळगांव.

(टिपः- स्थळप्रतीवर मा.अध्यक्ष व सदस्य-सचिव यांची स्वाक्षरी असे)